राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: खेआक्ष-१७१९/प्र.क्र.९६/क्रीयुसे-२**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२

दिनांक: १२ मार्च, २०२१

**वाचा:**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ , दिनांक ०१ जुलै,२०१६.

२. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट,२०१६.

३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक १७ मार्च, २०१७.

४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण १७१७/प्र.क्र.३९/क्रीयुसे-२ , दिनांक २७ मार्च, २०१७.

५. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७.

१. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १५ नोव्हेंबर,२०१७.

७. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १६ नोव्हेंबर,२०१७.

८. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च,२०१९.

९. शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर,२०१९

**प्रस्तावना:**

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ % आरक्षणासंदर्भात संदर्भाधीन क्र.(१) येथील दिनांक ०१ जुलै,२०१६ अन्वये, सुधारीत धोरण निश्चीत केले आहे. या संदर्भात संदर्भाधीन क्र.(२) ते (९) मधील शासन शुद्धीपत्रक व शासन निर्णयान्वये वेळोवेळी सुधारीत आदेश देण्यात आले आहेत. संदर्भाधीन क्र.(१) येथील

शासन निर्णय,दि.०१ जुलै,२०१६ च्या परिच्छेद क्रमांक ३ (ए) मधील अट सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.शासनाने याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

संदर्भाधीन क्र.(१) येथील, शासन निर्णय दिनांक ०१ जुलै,२०१६ च्या परिच्छेद ३ (ए) मधील अट खालील प्रमाणे आहे-

"आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सांघिक/वैयक्तिक स्पर्धेमध्ये किमान १२ देशांच्या संघाचा/ वैयक्तिक स्पर्धेमध्ये (वैयक्तिक क्रीडा प्रकार/प्रत्येक वजनी ग़टात) स्वतंत्रपणे किमान १२ खेळाडूंचा समावेश असावा. सर्व प्रकारच्या राष्ट्रीय/राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये किमान ६०% राज्य/ जिल्हे सहभागी होणे आवश्यक राहील "

**सदर अट खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे-**

"आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सांघिक/वैयक्तिक स्पर्धेमध्ये किमान १२ देशांच्या संघाचा/ वैयक्तिक स्पर्धेमध्ये (वैयक्तिक क्रीडा प्रकार/प्रत्येक वजनी ग़टात) स्वतंत्रपणे किमान १२ खेळाडूंचा समावेश असावा. सर्व प्रकारच्या राष्ट्रीय/राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये संबंधित खेळाच्या एकविध क्रीडा संघटनेशी संलग्न असणाऱ्या राज्य/ जिल्ह्यांपैकी किमान ६० % राज्य/जिल्हे सहभागी असणे आवश्यक राहील".

२. सदर आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या भरती प्रक्रीयेसाठी तसेच ज्या प्रकरणी निवड प्रक्रीया सुरू झाली असून निवड प्राधिकरणाने अद्याप अंतिम यादी (गुणवत्ता यादी) जाहीर केलेली नाही अशा प्रकरणी लागू राहतील.तथापि ज्या पदभरती प्रक्रियांचे अंतिम निकाल जाहीर झाले आहेत अशा प्रकरणांमध्ये सदर आदेश लागू राहणार नाहीत.

३. ५ टक्के खेळाडू आरक्षणासंदर्भात विहीत आवश्यक क्रीडा अर्हता,खेळ,स्पर्धाप्रकार तसेच अन्य अटी व शर्ती यासंदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश तसेच लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३१२१६४६५५०५२१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2021.03.12 16:52:55 +05'30'

**( स्वाती नानल )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

३. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे
४. सर्व मंत्रालयीन विभाग
५. सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख
६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
७. सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद
८. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई
१०. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
११. निवड नस्ती, क्रीयुसे-२